# महाराष्ट्र वस्तु व सेवाकर विभाग

राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
८ वा मजला, नवीन इमारत, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई - ४०० ०१०.

संदर्भ : १) शासन निर्णय क्र . विकवि-१२११/प्र. क्र.२९१/वि. प्र. ४ /मुंबई ,दि. १८.११. २०११

२) कार्यालयीन आदेश क्र . विविआ/म.रा./ पुनर्र्चना कक्ष /सुधारित कार्यानिहाय पदे / प्र. क्र. ५८/ब-४१३/ मुंबई ,दि. ०८. ०२. २०१२

## कार्यालयीन आदेश

क्र . राज्यकर आयुक्त /ऐषआराम कर / फेरवाटप_ द्वितीय अपील /ब- ६०८ मुंबई, दि. 6 JUL 2021

१) उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या आदेशान्वये आयुक्त कार्यालयासाठी व विशेष विक्रीकर आयुक्त यांच्या कार्यालयासाठी सुधारित अंतर्गत संरचना तक्ते निर्गमित करण्यात आले होते त्यानुसार अपर विक्रीकर आयुक्त (व्यवसायकर) यांच्याकडे ऐषआरामकर कायद्याखालील द्वितीय अपिलांचे काम सोपवण्यात आले होते त्यानंतर दि. ०१/०१/२०१६ रोजी विभागाची फेररचना करण्यात आली असून कार्यशाखानिहाय संरचने ऐवजी भौगोलिक संरचना अस्तित्वात आली आहे. त्यामुळे करदात्यांचे / व्यापाऱ्यांचे पिनकोडनिहाय वाटप नोडल अधिकाऱ्यांमध्ये करदात्यांच्या वर्गवारीनुसार करण्यात आले आहे. ही बाब विचारात घेऊन खालील प्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

२) दि. ०१/०१/२०१६ रोजी विभागाची फेररचना झाल्यानंतर ऐषआराम कर कायद्या अंतर्गत नोंदीत व्यापाऱ्यांचे फेरवाटप पिनकोड निहाय करताना ऐषआराम कायद्याखालील नोंदीत व्यापारी हे पिनकोड निहाय नोडल विभागातील अधिकाऱ्यांकडे वाटप करण्यात आले आहेत. त्यामुळे ऐषआराम कर कायद्या अंतर्गत दाखल होणाऱ्या व प्रलंबित असलेल्या

द्वितीय अपिलांच्या निपटाऱ्यांचे काम या आदेशान्वये क्षेत्रीय अपर राज्यकर आयुक्त व्हॅट - २,३ व व्यवसायकर यांच्याकडे देण्यात येत आहे.

३) सध्या प्रलंबित असलेल्या ऐषआराम कर कायद्या खालील द्वितीय अपिलांचे फेरवाटप उपरोक्त अपर राज्यकर आयुक्तांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील नोडल विभागानुसार येणाऱ्या पिनकोड निहाय करण्यात यावे.

या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

(राजीव कुमार मितल)
राज्यकर आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:

१. विशेष राज्यकर आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई.

२. मुख्य दक्षता अधिकारी, मुंबई

३. सर्व अपर राज्यकर आयुक्त

५. राज्यकर आयुक्तांचे विशेष कार्य अधिकारी

६. सर्व कार्यासन अधिकारी, आयुक्तांचे कार्यालय.

७. निवडनस्ती

८. स्थळ प्रत.